**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहिल्यानगर, पिन ४२३ १०९.
फोन नं.(०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Website - www.sai.org.in) (E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थानचे निवासस्थाने विभागांसाठी टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक व उत्पादक, नामांकीत कंपन्यायांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदेचे निकष,अटी / शर्ती व ई-निविदेचे माहितीसाठीश्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in./tender या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.३ / ९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.१७/ ९ /२०२५ सायं ०५.०० वा पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिर्डी - ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर**

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४


# श्री साईबाबा संस्थानचे
# निवासस्थाने विभागांकरिता
# टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरविणेबाबत ई-निविदा

**A.** **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे निवासस्थाने विभागांसाठी टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरविणेबाबत ई-निविदा-**

**B.** **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या ३ आर्थिक वर्षांची **किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. १,५०,००,०००/- (रू.एक कोटी पन्नास लाख) असणे अनिवार्य राहील.** तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

**E.** **निविदाधारकाने नमुने जमा करणे-**

१. संस्थानने BOQ मध्ये नमुद केलेप्रमाणे निविदाधारकास निविदेत दर भरलेल्या ४ फोम मॅट्रेससाठी एक नमुना व टु फोल्ड मेट्रेससाठी ०१ असे दोन नमुने दि.१५/५ /२०२५ पासून दि.१७/५ /२०२५ अखेर सायं. ०५.०० वाजेपर्यंत संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागात सदर मॅट्रेसवर आपले फर्मचे, नावाचे स्टीकर लावून जमा करणे बंधनकारक आहे. नमुना नसलेल्या मॅट्रेसच्या दरांचा विचार केला जाणार नाही.

२. निविदाधारकांनी सादर केलेले मॅट्रेसचा दर्जा User Department कडून तपासून घेतला जाईल. त्यामुळे निविदाधारकाने चांगल्या दर्जाचे नमुने द्यावेत. संस्थानकडे सादर केलेले नमुन्याप्रमाणेच मॅट्रेसचा पुरवठा करावा लागेल.

३. संस्थानकडे नमुना म्हणून जमा केलेले मॅट्रेस परत देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

४. **ज्या मॅट्रेससाठी दर भरले आहेत त्या मॅट्रेसचा नमुना सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. नमुना सादर न केल्यास त्यांच्या दरांचा विचार केला जाणार नाही.**

**D.** **पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम -**

१. **खरेदी करावयाचे टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा तपशिल BOQ मध्ये दिलेले आहे.त्याप्रमाणे दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. निविदा भरताना टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस BOQ मध्ये नमुद केलेले टेक्निकल स्पेसिफिकेशनचा विचार करूनच निविदा भरावी.**

३. निविदा फी रक्कम रु.३६,०००/- व बयाणा रक्कम रु.२,२५,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.

**E. निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि. ३ /५ /२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.१७/ ५ /२०२५ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

३. शक्य झाल्यास दि.१५/ ५ /२०२५ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

४. शक्यतो Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमधील तक्त्यात नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

**F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. टु फोल्ड मॅट्रेस - ०१ व फोम मॅट्रेस -०४ असे वेगवेगळे साईज नुसार दर मागविण्यात आले आहेत. ऑनलाईन दर भरताना निविदाधारकाने बीओक्यु प्रमाणे मॅट्रेसचे दर भरावेत.

२. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिग खर्च, जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह श्री साईबाबा संस्थानचे भांडार / साईआश्रम भक्तनिवास/साई धर्मशाळा / साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास विभागांमध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत. इतर कुठलीही रक्कम वेगळी आदा केली जाणार नाही.

३. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**G. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील.

२. तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या पुरवठादारांनी दिलेल्या, दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी गरजेनुसार चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**H. टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा शिर्डी येथील भांडार / साईआश्रम भक्तनिवास/साई धर्मशाळा / साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास विभागामध्ये करावा लागेल.

**I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत साहित्यांचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर आपले मागणीपत्र प्राप्त झालेनंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

**J. टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरवठा हा पुरवठा आदेश दिलेनंतर शक्यतो १२० दिवसांत दिलेले स्पेसिफिकेशन व मान्य नमुन्याप्रमाणे करावा लागेल. पुरवठा केलेले टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस स्पेसिफिकेशनप्रमाणे असलेबाबत गरजेनुसार शासकिय प्रयोगशाळा / सक्षम यंत्रणा यांचेकडून गरजेप्रमाणे Random तपासणी करुन अहवाल सकारात्मक प्राप्त झाले नंतरच देयक आदा करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधी संपले नंतरही ६ महिन्यांचे आत आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसची मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास ते मान्य दरानेच पुरविणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

**K. टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील स्पेसिफिकेशन,मंजूर डिझाईन व मान्य नमुन्याप्रमाणे टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बील सादर करावे.

२. ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी सर्व टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा मान्य झालेल्या नमुन्याप्रमाणे,त्याच दर्जाचा पुरवावा लागेल. कमी दर्जाचा, वेगळ्या प्रकारचा अगर खराब टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस स्विकारले जाणार नाहीत. असा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठा करीत असलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसची Quantity जास्त असल्यामुळे टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस स्विकारलेनंतरही टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा एखादा लॉट खराब आढळल्यास तो पुरवठाधारकास स्वखर्चाने बदलून द्यावा लागेल.

**L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसची संस्थानचे संबंधित विभागाकडून गरजेनुसार वस्त्र समिती, वस्त्र मंत्रालय भारत सरकार, वस्त्र प्रयोगशाळा व अनुसंधान केंद्र, मुंबई/ तत्सम प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचे रिपोर्ट मानकंनाप्रमाणे नसल्यास सदर टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस बदलून द्यावे लागेल.

**M. बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच बील आदा करणेत येईल. सदरपुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचे बील श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेपासून ४५ दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापि तांत्रिक कारणांमुळे बील आदा करणेस विलंब झाला तरीही आपणास मालाचा पुरवठा थांबविता येणार नाही.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व कर कपाती बिलातून करण्यात येतील.

४. पुरवठाधारकाने पुरविलेले टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस श्री साईबाबा संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या इतर टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसच्या बिलातुन वसुल केली जाईल अगर संस्थान प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात येईल.

N. **आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील माल मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीतजास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरविणेचा आदेश दिलेनंतर विहीत मुदतीत पुरवठा न झाल्यास अगर दिलेल्या टेक्निकल स्पेसिफिकेशन प्रमाणे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतके टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेससाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. पुरवठा आदेशातील मंजुर दराने व मान्य नमुन्याप्रमाणे टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

४. दुरध्वनी/ ई-मेलव्दारे कळविलेल्या विहित मुदतीनंतर विलंबाने पुरवठा केलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसवर थेट ५% दंड आकारण्यात येईल. खरेदी विभागाकडून टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरवठयापोटी वेळोवेळी केलेल्या ई-मेल व भ्रमणध्वनी आणि दुरध्वनीवरील संवाद/पत्रव्यवहार हा कुठल्याही कायदेशीर कारवाईसाठी (Legitimate Actions) अत्यंत महत्वाचा भाग म्हणून गणण्यात येईल याची प्रथम प्राधान्याने नोंद घ्यावी.

५. पुरवठाधारकाने टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाचे सुरक्षा अनामत रकमेतून/देय बिलांतून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

...५...

७. निविदाधारकाने स्वत:साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेषित नसावे. अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

## O. निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

## P. सर्व साधारण अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसच्या ५० टक्के टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

४. पुरवठादाराने टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच श्री साईबाबा संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तीचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर संबंधित पुरवठादाराबाबत संस्थान जो निर्णय घेईल तो संबंधित पुरवठादारावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधित पुरवठादाराची काहीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्यासाठी कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील. ई-निविदेसाठी जमा केलेली ई-निविदा फी कुठल्याही कारणास्तव वा सबबी खाली परत केली जाणार नाही. तथापी सदर निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवण्यात आला आहे.

८. तांत्रिक निविदेसोबत संस्थानने ऑनलाईन मागविलेले कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे ऑनलाईन सादर करु नयेत. त्याचा विचार केला जाणार नाही.

९. खरेदीची ई-निविदा प्रक्रिया ही महाराष्ट्र शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल.

१०. निविदेतील साहित्याचे Specification बाबत अगर निविदेबाबत काही अधिक माहिती हवी असल्यास कृपया ०२४२३-२५८७७१ अगर ०२४२३-२५८७७२ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१२. नामंजूर निविदाधारकांची बयाणा रक्कम,न्युनतम निविदाधारकास पुरवठा आदेश पारित केल्यानंतर ऑनलाईन www.mahatenders.gov.in या पोर्टलव्दारे परत करण्यात येईल. सदर बाबींची पुर्तता होणेकामी काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने निविदाधारकांनी सदर अटीचा विचार करणे गरजेचे आहे.

१३. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक
उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र
(३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल किमान रू. १,५०,००,०००/- असणे अनिवार्य)

दिनांक - / /२०२५
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ----------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२५

ठिकाण :- निविदाधारकाची सही व शिक्का

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहिल्यानगर.

**विषय– श्री साईबाबा संस्थानचे निवासस्थाने विभागांकरिता टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस पुरविणेबाबत ई-निविदा.**

महोदय,

मी/आम्ही खालील सही करणार कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली ई-निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसचा मंजुर दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यानंतर त्वरित मी/आम्ही रोख भरणा करु. अशी रक्कम मी भरणा न केल्यास, बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच यानंतरही सुरक्षा अनामत रक्कम पुर्ण होऊ शकली नाही, तर उर्वरीत सुरक्षा अनामत रक्कम मी पुरविलेल्या टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेसच्या बीलातून कपात करण्यासही माझी संमती आहे. तसेच रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे टु फोल्ड मॅट्रेस व फोम मॅट्रेस वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार / साईआश्रम भक्तनिवास/साई धर्मशाळा / साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२५
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव
(१) -----------------------------------
(२) -----------------------------------

सही/सहया व शिक्का

**सोबत-** कागदपत्रे

# वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ---------------------------------------------- यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या ३ वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०२१-२२ | |
| २ | सन २०२२-२३ | |
| ३ | सन २०२३-२४ | |
| | एकुण | |
| | ३ व्र्षांची सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / /२०२५

ठिकाण :-

Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi

BOQ

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Nos. | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **FOAM MATTRESS - Size - 72"x36"x4" (LWH)**<br>**Make /Brand** - Centurian/Curlon/Sleepwell/Dunlop/Godrej & Equivalent<br>**Technical Specifications** - 72x36x4 with High Density, Rebonded Foam AMD 40D Premium PU Foam with 18mm 240 GSM Knitted cloth Quilt with 20D Foam and 6mm at bottom witn Anti skit cloth 180GSM (with Anti Microbial Treatment) Beeding tape 1600 GSM (Heavy Quality) | 5265 | Nos. | | |
| 2 | **FOAM MATTRESS - Size - 72"x30"x4" (LWH)**<br>Make /Brand - Centurian/Curlon/Sleepwell/Dunlop/Godrej & Equivalent<br>**Technical Specifications** - 72x30x4 with High Density, Rebonded Foam AMD 40D Premium PU Foam with 18mm 240 GSM Knitted cloth Quilt with 20D Foam and 6mm at bottom witn Anti skit cloth 180GSM (with Anti Microbial Treatment) Beeding tape 1600 GSM (Heavy Quality) | 1785 | Nos. | | |
| 3 | **FOAM MATTRESS - Size - 80"x36"x4" (LWH)**<br>**Make /Brand** - Centurian/Curlon/Sleepwell/Dunlop/Godrej & Equivalent<br>**Technical Specifications** - 80x36x4 with High Density, Rebonded Foam AMD 40D Premium PU Foam with 18mm 240 GSM Knitted cloth Quilt with 20D Foam and 6mm at bottom witn Anti skit cloth 180GSM (with Anti Microbial Treatment) Beeding tape 1600 GSM (Heavy Quality) | 12 | Nos. | | |
| 4 | **FOAM MATTRESS - Size - 36"x80"x4" (LWH)**<br>**Make /Brand** - Centurian/Curlon/Sleepwell/Dunlop/Godrej & Equivalent<br>**Technical Specifications** - 36x80x4 with High Density, Rebonded Foam AMD 40D Premium PU Foam with 18mm 240 GSM Knitted cloth Quilt with 20D Foam and 6mm at bottom witn Anti skit cloth 180GSM (with Anti Microbial Treatment) Beeding tape 1600 GSM (Heavy Quality) | 20 | Nos. | | |
| 5 | **FOLDING MATTRESS - Size - 75"x 30"x 2" (LWH)**<br>**Make /Brand** - Centurian/Curlon/Sleepwell/Dunlop/Godrej & Equivalent<br>**Technical Specifications** - 75x30x2 Folding Mattress 400 GSM Canves Cloth and high Density Rebonded Foam plus 40D premium PU Foam | 3000 | Nos. | | |

(Goraksha Gadilkar, I.A.S.)
Chief Executive Officer
Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi